**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४७/२०१९** | **दिनांक ११/०६/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०५/०६/२०१९ ते ११/०६/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १२/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून १६/०६/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/०६ | ०६/०६ | ०७/०६ | ०८/०६ | ०९/०६ | १०/०६ | ११/०६ | | १२/०६ | १३/०६ | १४/००६ | १५/०६ | १६/०६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.६ | ०.० | ९.४ | ०.० | पाऊस (मिमी) | ६७ | २३ | ४५ | २० | ५० |
| ३४.४ | ३४.६ | ३४.० | ३५.२ | ३५.४ | ३४.६ | ३४.४ | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३३ | ३३ | ३४ | ३४ |
| २६.५ | २६.० | २५.३ | २७.० | २७.० | २४.० | २६.० | किमान तापमान (अं.से) | २७ | २६ | २७ | २६ | २६ |
| ६ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ७ | ६ | ६ |
| ८९ | ८३ | ७८ | ९२ | ९१ | ९० | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८४ | ८८ | ९० | ८९ | ८८ |
| ६० | ६० | ५४ | ४७ | ६७ | ७३ | ६७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५२ | ७९ | ७४ | ६९ | ६७ |
| ७.३ | ७.४ | ५.९ | ६.६ | ६.४ | ५.२ | ७.१ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २४ | १८ | ११ | ११ | १२ |
| नै. | प. | प. | नै. | नै. | नै. | नै. | वाऱ्याची दिशा | द. | नै.द. | नै.द. | द. | नै.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | १०.० | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १२ ते १६ जून, २०१९ पर्यंत मध्यम ते मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील तसेच वाऱ्याचा वेग ११ ते २४ किमी प्रती तास राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्हयामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार कोरडी स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोपवाटीका** | • पुढील पाचही दिवस मध्यम ते मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने भात पेरणीची कामे पूर्ण करून घ्यावी.<br>• एक एकर क्षेत्रावर लावणी करण्यासाठी रोपवाटिका ४ गुंठे क्षेत्रावर तयार करावी.<br>• गादीवाफ्यावर प्रती आर शेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट मिसळावे.<br>• जाड दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ५० ते ६० कि.ग्रॅ., बारीक दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ३५ ते ४० कि.ग्रॅ.आणि संकरीत जातीसाठी २० कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• रोपवाटीकेतील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर ७२ तासांपर्यंत वाफे ओले होताच पाऊसाची उघडीप बघून ऑक्सीडायरजील (६ ई. सी.) प्रती लिटर पाण्यात ३ मि. ली. याप्रमाणे प्रती आर शेत्रावर ५ लिटर या प्रमाणात एकसारखे फवारावे. |
| **नागली** | **रोपवाटीका पूर्वतयारी** | • नागली रोपवाटीकेसाठी निवडक क्षेत्रावर नांगरणी करून प्रती गुंठा क्षेत्रास २५० कि.ग्रॅ. कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. एक एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी रोपवाटिका ४ गुंठे क्षेत्रावर तयार करावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • आंबा फळांची काढणी झाल्यावर घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये हलक्या स्वरूपाची छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी.<br>• दहा वर्षावरील आंबा कलमास ५० ते १०० कि.ग्रॅ. चांगले कुजलेले शेणखत, १.५ कि.ग्रॅ. नत्र (३२५० ग्रॅम युरिया), ०.५ कि.ग्रॅ. स्फुरद (३१२५ ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट) व १.० कि.ग्रॅ. पालाश (२००० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश) खते प्रती कलमास पावसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी. खते कलमाच्या विस्ताराच्या आत सुमारे ४५ ते ६० सें.मी. रुंद आणि १५ सें.मी. खोल वर्तुळाकार चर खणून द्यावीत. चरामध्ये प्रथम पालापाचोळा, शेणखत टाकून त्यावर रासायनिक खते टाकून मातीने चर बुजवून घ्यावे. |
| **नारळ** | **-** | • नारळाच्या पाच वर्षावरील प्रती माडास ३० कि.ग्रॅ. शेणखत, ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट, ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा पावसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत/ |
| **फळबाग** | **नवीन लागवड** | • पाऊसाची शक्यता असल्याने फळबाग पिकांची नवीन लागवड सुरु करावी. |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटीका** | **लागवड** | • काकडी, चिबूड, पडवळ, दोडका, कारली या वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करावी.लागवड आळे पद्धतीने १.५ x १.० मीटर करावी. लागवड करताना प्रत्येक वेलाला २ किलो शेणखत व ५० ते ६० ग्रम मिश्रखत (सुफला) मातीत मिसळून देण्यात यावे.<br>• भेंडी पिकाची लागवड सरी पद्धतीने ६० x ६० सें.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १५ टन शेणखत, ७२ किलो युरिया, |

| | | |
|---|---|---|
| | | ३१३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ८३ किलो म्युरेट ऑफ पोटाश प्रती हेक्टरी खताची मात्र द्यावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | - | • जनावरांना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी पॅरा गवत, संकरीत नेपियर (जयवंत को- ३, यशवंत) या बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**